भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०४/२०१७

१)ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १२/०४/२०१७ चे १२.०३ वा. दरम्यान यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपले ताब्यातील जैतपुर कडुन खोलमारा कडे जात असता ट्रॅक्टर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मृतक सुधाकर रघुनाथ बडोले वय ५० वर्ष, रा. जैतपुर हा ट्रॉलीचे हिचवर बसला असतांनी ट्रॉलीत बसण्यास न सांगता निष्काळजीपणे ट्रॅक्टर चालवुन मृतक हा खाली पडुन त्याचे पोटावररून ट्रॅक्टरचा चाक जाऊन गंभिर जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करिता प्राथमीक आरोग्य केंद्र बारव्हा येथे उपचार करून रेफर केल्याने सामान्य रूग्णालय भंडारा येथे आनले असता तेथील डॉक्टराने चेक करून मृत घोषीत केल्याने डॉ. रिपोर्ट व चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना. बागडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३०४(अ),भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि यादव पोलीस स्टेशन दिघारी हे करीत आहे.

२) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १०/०४/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष १० महिने ही कॉस्ट व्हॅलीडीटी सर्टीफीकेट आणने करिता भंडारा येथे जाते म्हणुन घरून निघुन गेली परंतु अजुनपर्यत घरी परत आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

३) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक १२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे लाखांदुर येथअवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५४ लिटर हातभट्टी दारु किंमती १५,०००/—रु. असा एकुण १५,०००/—रु. जप्त करण्यात आला आहे.

४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.